# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टॉवर्स,
नरीमन पॉईंट,
मुंबई – ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एसटीडी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

जावक क्र.मजीप्रा/मस/तांशा.१/३५०/ ।8।

दिनांक १५/१/२००१

## // परिपत्रक क्रमांक ६० //

विषय :- बृहत आराखड्याच्या अनुषंगाने कामाच्या अंमलबजावणीबाबत घेण्यात आलेले निर्णय .

संदर्भ :- या कार्यालयाचे दिनांक ३/२/९८ चे पत्र क्र.मजीप्रा/मस/तांशा.१/३३३

राज्यातील ग्रामीण व नागरी क्षेत्रातील सर्व गावांना / शहरांना ३१ मार्च २००४ पर्यंत पाण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या महत्वाकांक्षी कार्यक्रमाच्या वेगवान अंमलबजावणीसाठी संदर्भीय पत्राव्दारे निर्गमित करण्यात आलेल्या काही सूचनांचा प्राप्त परिस्थितीत पुनर्विचार करणे गरजेचे झाले होते. असे करत असतांना "निधीची उपलब्धता " या महत्वाच्या मुद्यांचा विचार करण्यात येवून खालील मुद्यांबाबत पूर्वीच्या सूचना रद्द करण्यात येवून सुधारित सूचना देण्यात येत आहेत.

या अनुषंगाने सोबत जोडलेल्या प्रपत्राचे अवलोकन व्हावे ज्याव्दारे बृहत आराखड्यापूर्वी व नंतर बृहतआराखडयाच्या अंमलबजावणीसाठी करारपत्रामध्ये जी कलमे अंतर्भूत होती या नव्याने सुधारित करण्यात आली होती त्याची सारांशाने माहिती दिलेली आहे.

प्रगती पथावरील योजनांसाठी आवाश्यकतेनुसार निधी मुक्त करणे नेहमीच आवश्यक झाले आहे. अशा परिस्थितीत बृहत आराखड्याची समयबध्द अंमलबजावणी विचारात घेवून जी कलमे सुधारित केली त्यांचे अंमलबजावणीत अडचण येत आहे. त्यामुळे यापुढे विविध कामांच्या ज्या निविदा मागविण्यात येतील त्या निविदांमध्ये बृहतआराखडया संदर्भात विचारात घेतलेली सदर कलमे अंतर्भूत करणे सयुक्तीक ठरणार नाही. या अनुषंगाने सोबतच्या प्रपत्राचे अवलोकन करुन यापुढे ज्या निविदा मागविण्यात येतील त्यामध्ये सोबतच्या प्रपत्रमध्ये दर्शविल्याप्रमाणे सुधारित करण्यात आलेली कलमे त्याच स्वरुपात निविदामध्ये समाविष्ठ करावित.

हे परिपत्रक या परिपत्रकाच्या दिनांकानंतर प्रसिध्द होणाऱ्या सर्व निविदांसाठी लागू राहील.

सहपत्र : एक प्रपत्र

( सुरेश सावळी )
सदस्य सचिव

M. J. P.
ISSUED
17 JAN 2001
MUMBAI-21

प्रत.
मा.मंत्री,ग्रा.वि.पा.पु.व स्व. मंत्रालय मुंबई यांचे माहितीसाठी
मा.राज्यमंत्री, पा.पु.व स्व.तथा उपाध्यक्ष म.जी.प्रा. मंत्रालय मुंबई यांचे माहितीसाठी
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा उपाध्यक्ष म.जी.प्रा. मंत्रालय मुंबई यांचे माहितीसाठी
सदस्य सचिव (ता.) म.जी.प्रा. मुंबई यांचे माहितीसाठी
विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता, म.जी.प्रा.नवी मुंबई यांचे माहितीसाठी
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,म.जी.प्रा. नवी मुंबई , यांचे माहितीसाठी
सर्व मुख्य अभियंता,म.जी.प्रा. यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
सर्व अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा.मंडळ यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
सर्व कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.वा.विभाग यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

### प्रपत्र-अ

**बृहत आराखडयानुसार निविदा प्रपत्रातील कलमामध्ये करण्यांत आलेले बदल.**

| अ.क्र. | तपशील. | बृहत आराखडयात नव्याने उद्‌धृत केलेली ठेकेदाराच्या करारामधील कलमे. | बृहत आराखडयाच्या अगोदर ठेकेदाराच्या करारामधील संबंधीत कलम. | यापुढील काळात समाविष्ट करावयाच्या अटी. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | कामाच्या मुदतीत वाढ. | सर्वसाधारणपणे कोणत्याही कामासाठी रास्त व समर्थनिय कारणे असतील तर जास्तीत जास्त एकदाच ३ महिन्या-पर्यंतच्या कालावधीची मुदतवाढ सक्षम अधिकारी देऊ शकतील. | सर्वसाधारणपणे कोणत्याही कामासाठी समर्थनिय व रास्त कारणे असतील तर कामे पूर्ण होईपर्यंत आवश्यक तितक्या मुदत वाढी सक्षम अधिकारी देऊ शकत होते. | रकाना-४ प्रमाणे. |
| २ | काम पूर्ण करण्याचा कालावधी. | १८ ते २४ महिने (काम मार्च २००० पर्यंत पूर्ण होण्यासाठी) निविदेमध्ये विहीत केलेल्या कालावधीत काम पूर्ण होत नाही असे दिसले तर आणि कामात अवाजवी उशीर होत आहे असे निदर्शनास आले तर ठेकेदाराकडून ठराविक दराने लिक्विडेटेड डॅमेजेस वसूल करणे. | कामाच्या गरजेनुसार आवश्यक तो कालावधी निविदेमध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये काम पूर्ण न होण्यास जर कंत्राटदार जबाबदार असेल तर त्याचा आढावा घेऊन कंत्राटदाराविरुध्द दंडात्मक आकारणी केली जात असे. दंडाची रक्कम सक्षम अधिकारी ठरवू शकत असे. | रकाना-४ प्रमाणे. |
| ३ | वाढीव कालावधीतील भाववाढ देयकाची अदायगी. | निविदेमध्ये दर्शविलेला कालावधी संपल्यानंतर त्या दिवशी लागू असलेले मुल्य निर्देशांकच पुढील वाढीव कालावधीत देखील लागू रहातील, आणि त्यात प्रत्यक्ष वाढ झाल्यास ती ठेकेदारास देय होणार नाही. मात्र मुल्य निर्देशांक कमी झाले तर त्यानुसार निविदेतील सुत्रानुसार काढलेल्या रकमेची वसुली करण्याची तरतुद निविदेत करण्यांत आली होती. | कामांना मुदतवाढ देतांना जर कंत्राटदारास जबाबदार न धरता मुदतवाढ दिली असेल तर त्या वाढीव कालावधीसाठी त्या वाढीव कालावधीतील मुल्य निर्देशांकानुसार भाववाढ दिली जात असे. मात्र कंत्राटदारास जबाबदार धरुन मुदतवाढ दिली असेल तर मुल्य निर्देशांक गोठविण्यांत येत असत. यासाठी शासनाच्या दिनांक | रकाना-४ प्रमाणे. |

| अ.क्र. | तपशील. | बृहत आराखडयात नव्याने उद्‌धृत केलेली ठेकेदाराच्या करारामधील कलमे. | बृहत आराखडयाच्या अगोदर ठेकेदाराच्या करारामधील संबंधीत कलम. | यापुढील काळात समाविष्ट करावयाच्या अटी. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | १०.१.९२ च्या शासन निर्णयाचा आधार घेण्यांत येत असे. | |
| ४ | देयकाची अदायगी. | ठेकेदाराकडून देयक प्राप्त झाल्यानंतर देयकाच्या ७५ टक्के रक्कम देयक प्राप्त झाल्यापासून ३ दिवसांत ठेकेदारास आगाऊ रक्कम म्हणून अदा करावी व उर्वरित रक्कम पुढील १५ दिवसांत अदा करावी. | निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा करण्यांत येत असत. सर्वसाधारणपणे देयके अदा करण्यासाठी कोणत्याही कालावधीचे बंधन नव्हते. तथापी दरमहा किमान एक देयक देणे अपेक्षित असे. | रकाना-४ प्रमाणे. |
| ५ | अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम. | स्वीकृत्त निविदेचा देकार निविदेतील दरापेक्षा १० टक्के वा त्यापेक्षा कमी असेल तर कंत्राटदाराकडून अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम घेण्यांत यावी.<br>१० टक्के ते १५ टक्के कमी दराच्या निविदा - २ टक्के अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम.<br>१५ टक्के पेक्षा जास्त कमी दराच्या निविदा - ४ टक्के अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम. | अशा पध्दतीचे कलम निविदेमध्ये अंतर्भुत नव्हते. | रकाना-३ प्रमाणे सुरु ठेवावे, कारण सुरक्षा अनामत परतीचे आदेश लागु झालेले आहेत. |
| ६ | जमवाजमव उचल. | जमवाजमव उचल ही स्वीकारलेल्या कामाच्या किंमतीच्या १० टक्के एवढी देण्यांत यावी. यापैकी ५ टक्के निविदा स्वीकारल्यानंतर व उर्वरित ५ टक्के कामे प्रत्यक्षात चालू झाल्यानंतर. | रु. १ कोटी पेक्षा जास्त किंमतीच्या निविदांसाठी, निविदेतील अंदाजित किंमतीच्या ५ टक्के जमवाजमव उचल देण्यांत यावी. | पूर्णत: वगळण्यांत यावे. |